वाचले – १. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२२/प्र.क्र. ३३२/नवि-२२, दि. २४ जून २०२४

२. मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ११५९२, दि. १०/०३/२०२२

३. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक २३, दि. ०६/०४/२०२२

४. मा. प्रशासक यांचेकडील मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.७७४, दि. १४/१०/२०२४

५. जाहिरात क्र. ३२४/२०२४-२५, क्र.वायसीएमएच/१३/कावि/२४५/२०२४, दि.४/१२/२०२४

६. निवड समिती सभा दि. २०/०२/२०२५ रोजीचा सभावृतांत.

७. मा. आयुक्त सो, यांचेकडील दिनांक ११/०३/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८
पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
क्र. वायसीएमएच/१३/कावि/३४/२०२५
दिनांक - ११/०३/२०२५

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका, परिचर्या विज्ञान संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता करार /एकत्रित ठोक मानधनावर मुलाखतीद्वारे तात्पुरत्या स्वरुपात प्राचार्य, उप प्राचार्य पद भरणेबाबत.....

महोदय,

उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका, परिचर्या विज्ञान संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत बी.एस्सी नर्सिंग कॉलेज सुरु करण्यासाठी विविध संवर्गातील २४ पदे व तद्अनुषंगीक वेतनश्रेणीस तत्वत: मान्यता प्राप्त झालेली आहे. वाचले क्र. २ ,३ व ४ अन्वये सदरची पदे ३६४ दिवस कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणेकामी मान्यता मीळालेली आहे. वाचले क्र. ५ अन्वये सदर पदांकरीता जाहिरात क्र. ३२४/२०२४-२५, दि. ०४/१२/२०२४ अन्वये वर्तमानपत्रात व मनपाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. वाचले क्र. ६ अन्वये गठीत निवड समितीचा सभावृतांत प्राप्त झालेला आहे.

निवड समितीने दि. २०/०२/२०२५ रोजी पात्र उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन जाहिरातीमध्ये नमुद असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, गुणांकन व इतर बाबी विचारात घेऊन गुणांकनानुसार खालील नमुद उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची आदेशाच्या दिनांकापासुन म्हणजे दिनांक - ०१/०४/२०२५ ते दि. ३०/०३ /२०२६ या ३६४ दिवस कालावधिकरीता खालील अटी व शर्तीस अधिन राहुण पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात करार / एकत्रित ठोक मानधनावर नियुक्ती देणेस मंजुरी देत आहे. नीयुक्ती दिलेल्या उमेदवारांना देण्यात येणारे मानधन खालील स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

## प्रपत्र अ

| अ.क्र. | नाव | नियुक्ती पदनाम | प्रवर्ग | निवड समितीने केलेल्या शिफारसीचा प्रवर्ग | दरमहा द्यावयाचे करार/ठोक मानधन र.रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम. सुप्रिया बबन चिंचपुरे | प्राचार्य | खुला | खुला | १,२४,९०० |
| २ | श्रीम. कविता पोपट केळकर | उप प्राचार्य | खुला | खुला | १,०४,००० |

अटी व शर्ती :-

१. उक्त नमुद पदावरील कर्मचा-यांना कंत्राटी करारनाम्यामध्ये तसेच जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी- शर्ती बंधनकारक राहतील.

२. नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रुजू होताना ते कोणत्याही नर्सिंग कॉलेज/ शैक्षणिक संस्थेत नोंदणी/ काम करत नसलेबाबत हमीपत्र / कार्यमुक्त आदेश (रिलीव्हींग ऑर्डर) देणे बंधनकारक आहे.

३. भारतीय परिचर्या परिषद (INC) महाराष्ट्र परिचर्या परिषद (MNC) ने निर्धारित केलेली परावैद्यकीय संस्थातील प्राचार्य/उपप्राचार्य पदासाठीची किमान अर्हता १९४७ (२०२५ पर्यंतच्या सुधारणांसहीत) नुसार उमेदवारांची पात्रता असावी.

४. उक्त नमुद पदाचा कामकाज कालावधी आदेशात नमुद केलेप्रमाणे राहिल.

५. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवास भत्ता, इतर सवलत मिळणार नाही.

६. नियुक्ती पदांवरील कामकाजाची वेळ सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:००पर्यंत राहिल. तथापि, रुग्णालयीन कामकाज २४X७ चालु असले कारणाने रुग्णसेवेच्या दृष्टीने संबधित विभागप्रमुख अथवा अधिष्ठाता यांनी सुनिश्चित केलेल्या वेळेनुसार त्यांनी काम करणे बंधनकारक राहिल. कामावर येताना व जाताना नियमित बायोमेट्रीक पध्दतीने विभागप्रमुखांनी सुनिश्चित केलेल्या विहित वेळेनुसार थंम्ब इंम्पेशन करने व हजेरी मस्टरवर स्वाक्षरी करणे बंधनकारक राहिल. ज्या दिवसाची थंम्ब व हजेरी मस्टरवर स्वाक्षरी नसेल त्या दिवसांचे मानधन अदा केले जाणार नाही. थंम्ब इंम्प्रेशन करताना वेळेत करणे आवश्यक आहे. लेट झाल्यास तीन लेट मागे एक दिवसाचे वेतन कपात करणेत येईल.

CamScanner

७. कामावर वेळेत हजर राहुन ओळखपत्र परिधान करणे बंधनकारक राहिल. अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल.

८. नेमणूक झालेल्या उमेदवारांनी रुजू झालेवर, त्यांचे वेतन अदा करणे सोईचे होणेकरीता बँक ऑफ बडौदा पी.सी.एम.सी. शाखा मुख्य कार्यालय पिंपरी पुणे – १८ येथे खाते उघडून, खाते क्रमांक व ई.सी.एस फॉर्म भरुन सोबत आवश्यक भरुन सोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन शाखा प्रमुखांमार्फत संबधित पगार लिपिकाकडे सादर करणेत यावी. सदर पुर्तता वेळेत न केलेस व पगारास विलंब झालेस त्यास रुग्णालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

९. नेमणुक झालेल्या उमेदवारांनी मा. अधिष्ठाता, यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करावयाचे आहे. यामध्ये टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा केल्यास त्यांचा कार्यकाल खंडीत करण्यात येईल. वरील पदांचे कामकाजावर अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांचे नियंत्रण राहिल. तसेच उक्त नमुद पदाचे कामकाजाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार विभागप्रमुख मा. अधिष्ठाता यांना राहतील.

१०.सदर आदेशातील उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेली व्यक्तिगत माहिती व मुळ कागदपत्राच्या प्रति खोट्या / बनावट असलेचे आढळुन आल्यास भारतीय न्याय संहिता कलम १९९ व २०० मधील तरतुदीनुसार उमेदवार कारवाईस पात्र राहिल.

११.सदर आदेशातील अटी व शर्तींचा भंग केल्यास इंडीयन कॉन्ट्रॅक्ट अॅक्ट मधील कलम ७३ चे तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२.नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रुजु झालेनंतर सहा महिनेचे कालावधित एम.एस.सी.आय.टी सर्टीफीकेट संस्थेकडे सादर करणे अनिवार्य आहे. सादर न केल्यास सदर उमेदवारांचा सेवा कालावधी संपुष्ठात येईल.

१३.सर्व नेमणुका ह्या ३६४ दिवस कालावधिकरीता हंगामी स्वरुपात आहेत. उमेदवारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही. तसेच सदरच्या पदावर ज्या दिनांकास स्थायी अस्थापनेवर (सरळ सेवेने) प्राचार्य/ उप प्राचार्य नियुक्ती होईल त्या दिनांकास मानधनावरील सेवा संपुष्ठात येईल.

१४.सदर नेमणुक ही अस्थायी असल्यामुळे नेमणूक कालावधी पुर्ण होताच सदर नेमणुक आपोआप संपुष्टात येईल.

१५.सदर नेमणूक ही पुर्णपणे तात्पुरती / हंगामी स्वरुपाची व स्थानिक परिस्थीती व गरजेणुसार करणेत आलेली आहे. मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे महापालिका आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही. किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात (दोन साथीदारांसह संपुर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे.) र.रु. ५००/- चे स्टँम पेपरवर हमीपत्र लिहुन द्यावे लागेल. मानधनावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

१६.सर्व पदांना अदा करणेत येणारे मानधन हे ७ व्या वेतन आयोगानुसार महाराष्ट्र सासन निर्णय क्र. वेतन - २०१९/प्र.क्र.०३/२०१९/बैसेवा-२, दि. ३१/१२/२०२०, अन्वये (ठोक मानधन) तसेच महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागु असणा-या सुविधा, हक्क, वेतनवाढ, अर्थिक व तद्अनुपंगिक अन्य कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.उदा. बोनस व सानुग्रह अनुदान, वैद्यकीय प्रतिपुर्ती इ.

१७.नियुक्तीच्या कालावधीत दिड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे एकूण ८ किरकोळ रजा एका वर्षासाठी देय राहतील. नेमणुकीच्या सुरवातीचे दीड महिना कालावधीत किरकोळ रजा अनुज्ञेय राहणार नाही. आठवड्यातुन फक्त एक दिवस रुग्णालय/ दवाखान्याच्या सोयीनुसार साप्ताहिक सुट्टी राहिल. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुट्टीच्या ज्या दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुट्टी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कामकाजाबाबतचा कोणताही अर्थिक मोबदला/ फायदा देय राहणार नाही. तथापि, त्याची पर्यायी रजा उपभोगता येईल.

१८.उमेदवारांने संस्थेच्या व कामाच्या प्रती एकनिष्ठता ठेवणे अपेक्षीत आहे. कंत्राटी नियुक्तीचे पदावर काम करताना आपणाकडून सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहिल.

१९.आपले कामकाज / वर्तणूक असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच आपण विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा आपली हजेरी असमाधानकारक असल्यास, आपले कामकाजाबाबत विभागप्रमुख अधिष्ठाता यांचेकडे काही तक्रारी प्राप्त झाल्यास संबधितास तशी सक्त ताकीद देण्यात येईल त्यानंतरही कामात विशेष सुधारणा न झाल्यास त्यांना कामावरुन कमी करणेबाबत कार्यवाही केली जाईल.

२०.नेमणुक झालेल्या उमेदवारास सदर पद / नोकरी सोडताना किमान एक महिन्याची पुर्वसुचना देणे बंधनकारक राहिल. अन्यथा त्यांना एक महिन्याचे मानधन महापालिका कोपागारत जमा करावे लागेल. राजीनाम सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास त्या महिन्याचे हजर दिवसांचे मानधन अदा केले जाणार नाही. तसेच एक महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा केलेशिवाय अनुभव प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

२१.आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतुन TDS वजा करुन अंतिम देय रक्कम अदा करण्यात येईल.

CamScanner

२२.सदर उमेदवारांनी आदेशाच्या दिनांकापासुन ०७ दिवसाच्या आत पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुजु व्हावे. रुजु होतेवेळी कागदपत्रांच्या मुळ प्रती व अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहिल. विहित मुदतीत रुजु न झालेस आपली नियुक्ती संपुष्टात येईल. व त्यामुळे रिक्त पदावर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवारांची नेमणुक करण्यात येईल. तदनंतर याबाबत आपले म्हणणे विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

प्रति,
२/- सर्व संबधित कर्मचारी

प्रत,-

१. लेखा विभाग, २. सामान्य प्रशासन विभाग, ३. सर्व्हेर विभाग, वाय.सी.एम.एच ४. परिचर्या विज्ञान संस्था, वाय.सी.एम.एच ५. सर्व संबधित विभाग ६. आस्थापना लिपिक ७. सर्व्हेर विभाग,वाय.सी.एम.एच

**(डॉ. राजेंद्र वाबळे)**
अधिष्ठाता
पदव्युत्तर संस्थायशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय .
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८

CamScanner